आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२९ जून २०२४ - शनिवार

राज्यातल्या जेष्ठ नागरिकांना तीर्थस्थळांचं दर्शन घडवण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना लागू करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत केली. तातडीनं अंमलबजावणी करण्यासाठी, लवकरच नियमावली तयार करून इच्छुकांकडून ऑनलाईन अर्ज मागवू, असं ते म्हणाले.

<><><><><>

पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचं नुकसान होऊ नये, यासाठी सरकार बांधिल आहे. यासंदर्भात विरोधी पक्षानं दिलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार करू , असं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिलं. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवर, माजी अध्यक्ष नाना पटोले आदी सदस्यांनी विधानसभेत ‘नीट’ परीक्षेत झालेल्या गैरप्रकाराचा मुद्दा स्थगन प्रस्तावाद्वारे उपस्थित केला होता.

प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये वाहन चालकांना परवाने देताना होणाऱ्या घोटाळ्यांचा मुद्दा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत उपस्थित केला. याप्रकरणी योग्य उपाययोजना करण्याची सूचना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सरकारला केली.

राज्यात विविध ठिकाणी स्फोटक किंवा तत्सम कारखान्यांमध्ये होणाऱ्या स्फोटांचा मुद्दा सभागृहात मांडण्यात आला. या प्रकरणात, आत्तापर्यंत केलेल्या कारवाईची माहिती कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी दिली.

<><><><><>

विधानपरिषदेच्या सभापतीपदाची निवडणूक लवकरात लवकर जाहीर करावी अशी मागणी आज विरोधकांनी विधानपरिषदेत केली. गेले अनेक दिवस विधानपरिषदेचं सभापतीपद रिक्त आहे हे संविधानाला धरून नाही असं सांगत शेकापचे जयंत

पाटील यांनी हा मुद्दा उपस्थित केला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी देखील जयंत पाटील यांच्या मुद्द्याला समर्थन दिलं. सोमवारी गटनेत्यांच्या बैठकीत यावर चर्चा करता येईल असं उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यावेळी सांगितलं.

<><><><>

जनतेला विश्वासात घेऊन आणि स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधूनच राज्यातील प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाची पुढची प्रक्रिया केली जाईल,अशी ग्वाही सार्वजनिक बांधकाम मंत्री दादा भुसे यांनी आज विधानपरिषदेत दिली. शेतकऱ्यांचा विरोध असल्याने हा महामार्ग रद्द करावा अशी मागणी काँग्रेसचे सतेज पाटील यांनी आज लक्षवेधीच्या माध्यमातून केली.

शहरं विद्रुप करणाऱ्या बेकायदेशीर जाहिरात फलकांना चाप लावण्यासाठी आवश्यकता भासल्यास कायद्यात  बदल केला जाईल, असं या विभागाचे प्रभारी मंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. मुंबईत घाटकोपर इथं झालेल्या होर्डिंग दुर्घटनेप्रकरणी शिवेसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सुनील शिंदे यांनी लक्षवेधी सुचनेद्वारे सरकारचं लक्ष वेधलं.

<><><><>

गेल्या तीन वर्षांत दाओस इथं केलेले सामंजस्य करार आणि या करारांच्या अंमलबजावणीची वस्तुस्थिती मांडणारी श्वेतपत्रिका राज्य सरकार काढेल अशी घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत केली.

<><><><>

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर काल रात्री झालेल्या अपघातात ६ जण ठार आणि ४ जण जखमी झाले. जालना जिल्ह्याच्या हद्दीत कडवंची गावाजवळ हा अपघात झाला. या दुर्घटनेतले मृत आणि ३ जखमी मुंबईचे रहिवासी होते.

<><><><>

आगामी विधानसभा निवडणुका महायुतीच जिंकेल असा विश्वास भाजपचे मुंबई अध्यक्ष आशीष शेलार यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपाच्या कोअर कमिटीची बैठक आज मुंबईत झाली. त्यानंतर शेलार बोलत होते. यात राज्य सरकारनं सादर केलेल्या अर्थसंकल्पावर अभिनंदन ठराव झाला. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्व २८८ मतदार संघातल्या प्रचारासाठीचा कार्यक्रम १० जुलैपर्यंत ठरवणार असल्याचं ते म्हणाले. भाजपचे राज्य प्रभारी भूपेंद्र यादव, सहप्रभारी अश्विनी वैष्णव, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे तसंच इतर नेते बैठकीला उपस्थित होते.

<><><><>

पुणे विमानतळाचं नवं टर्मिनल लवकरच खुलं होणार असल्याची माहिती केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली. ते आज पुण्यात वार्ताहरांशी बोलत होते. या टर्मिनलच्या सुरक्षेसाठी आवश्यक असणारं सीआयएसएफचं मनुष्यबळ द्यायला गृहविभागाने मंजुरी दिली आहे, असं मोहोळ यांनी सांगितलं.

<><><><>

नाशिकमधल्या कश्यपी धरणग्रस्तांचा विरोध मावळल्यामुळे कश्यपी धरणातून गंगापूर धरणामध्ये ५०० क्युसेक्स वेगानं पाण्याचा विसर्ग सुरू झाला. गंगापूर धरणामध्ये १७ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगालचे राज्यपाल डॉक्टर सी.व्ही. आनंद बोस यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या विरोधात मानहानीची याचिका दाखल केली आहे. महिला कोलकाता राजभवनात जाण्यास घाबरतात, अशा आशयाचं विधान बॅनर्जी यांनी केलं होतं.

**<><><><><>**

वेस्ट इंडिजमध्ये सुरु असलेला टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज बार्बोडस इथं  भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात अंतिम सामना होईल. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री आठ वाजता हा सामना सुरू होईल. भारतानं गेल्या सात महिन्यांमध्येच दुसऱ्यांदा आयसीसी विश्वचषक स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आहे.